नि.फौ.ख.क्रं.६७/२०२२.
सरकार वि. प्रभाकर.
**नि.क्रं.३५.**

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०६ यांची जबानी.</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की–

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | प्रविण तुलाराम हारगुडे, |
| वय सुमारे | : | ४१ वर्ष, व्यवसाय– पि.एस.आय. |
| निवासस्थान | : | पोलीस ठाणे, कन्हान, तालुका: पारशिवनी, |
| तालुका | : | पारशिवनी, जिल्हा: नागपूर. |

**सरतपास — सहा. सरकारी वकील श्रीमती रामटेके मॅडम यांचेमार्फत–**

१. दिनांक ०६.०३.२०२२ रोजी पोलीस ठाणे, पवनी येथे पी.एस.आय. या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी माझी पुर्ण दिवशी ड्युटी होती. त्यावेळी मला अपराध क्रमांक ५९/२०२२ भारतीय दंड संहितेचे कलम ३५४–अ चा तपास मिळाला. त्यामध्ये मला प्रथम खबर अहवाल व तोंडी रिपोर्ट मिळाला. त्यानंतर मी फिर्यादीला वैद्यकीय तपासणीकरीता पाठविले, त्याकरीता मी पत्र दिले. आता मला ते पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्रं.३६** देण्यात येते.

२. त्यानंतर मी दुस–या दिवशी पंचांना समन्स देवुन घटनास्थळ पंचनामा तयार केला. आता मला ते सुचनापत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्रं.३७** देण्यात येते. त्यानंतर मी नगर परिषदेची चाळ आहे, तेथे कान्हा साडी सेंटर येथे गेलो. ते घटनास्थळ फिर्यादीने मला दाखविले. त्यानंतर मी घटनास्थळाचे सवीस्तर वर्णन करून घटनास्थळ पंचनामा तयार केला. आता मला तो घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास <u>आधीच नि.क्रं.१८</u> देण्यात आलेला आहे.

३. मी फोटोग्राफरच्या मार्फत घटनास्थळाचे फोटो काढले. ते मला दाखविण्यात आले. त्यास आधीच निशानी क्रमांक २३ ते २५ देण्यात आलेले आहेत.

४. फोटोग्राफर याला भारतीय पुरावा कायद्याचे कलम ६५(ब) चे पत्र दिले होते. आता मला ते पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्रं.३८** देण्यात येते. त्यानंतर फोटोग्राफरने ६५(ब) चे प्रमाणपत्र दिले होते. त्यानंतर आरोपीला ताब्यात घेवुन त्याची वैद्यकीय तपासणीकरीता ग्रामीण रूग्णालय पवनी यांना पत्र दिले. आता मला ते पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि.क्रं.३९ देण्यात येते. त्यानंतर आरोपीला अटक करून त्याला अटकेची माहीती त्याला दिली. आता मला तो अटक पंचनामा

दाखविण्यात आला. त्यास **नि.क्रं.४०** देण्यात येते.  अटकेची माहीती त्याच्या पत्नीला देण्यात आली होती.  आता मला ते पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्रं.४१** देण्यात येते.

५.	त्यानंतर आरोपीला न्यायालयातर हजर केले. आणि त्यानंतर त्याला जेलमध्ये रवाना केले. त्यानंतर फिर्यादी आणि साक्षीदारांना सुचनापत्र दिले. आता मला ते सुचनापत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्रं.४२** देण्यात येते. तसेच दुस–या साक्षीदाराला सुचनापत्र दिले, त्यावर माझी सही आहे, त्यास **नि.क्रं.४३** देण्यात येते.

६.	फिर्यादीचे बयान महिला पोलीस अधिकारी सुमीत्रा साखरकर यांनी नोंदविले.  ईतर साक्षीदारांचे बयान मी नोंदवुन घेतले.  तसेच फिर्यादीचे बयान चित्रफित करण्यात आले.  तसेच त्याची हॅशव्हॅल्यु काढण्यात आली. आणि भारतीय पुरावा कायद्याचे कलम ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले.  हॅशव्हॅल्यु काढत असतांना जे पंच होते त्यांना सुचनापत्र देण्यात आले होते. आता मला ते सुचनापत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास आधीच नि.क्रं.२९ देण्यात आलेला आहे.

७.	सॅनडिक्स कंपनीचा लाल रंगाचा पेनड्राईव्ह जप्त केला होता.  आता मला तो जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचांची सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास आधीच नि.क्रं.३० देण्यात आलेला आहे.  फिर्यादीचे फौजदारी प्रक्रिया संहितचे कलम १६४ अन्वयेचे बयान नोंदविण्याकरीता पत्र दिले. आता मला ते पत्र दाखविण्यात आले, त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्रं.४४** देण्यात येते.

८.	ज्या ठिकाणी घटना घडली त्या दुकानाचे कागदपत्र मिळण्याकरीता नगरपरिषद यांना पत्रव्यवहार केला होता. आता मला ते पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्रं.४५** देण्यात येते. त्यासोबत दस्त प्राप्त झाले, त्यास दस्तांना अनुक्रमे **वस्तु क्रमांक अ, ब व क** देण्यात येते.

९.	त्यानंतर गुन्हयामध्ये कलमवाढ करून न्यायालयाला कळविले. आता मला ते पत्र दाखविण्यात आले. त्यावर पी.आय. साहेबांची सही आहे. त्यास **नि.क्रं.४६** देण्यात येते. त्यानंतर तपास पुर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.  तपासामध्ये आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. मी आरोपीला ओळखतो. तो आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**<u>उलट तपास – आरोपीतर्फे वकील श्री. डी. एल. देशमुख यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>**

१०. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे पोलीस ठाण्यापासुन वीस ते तीस पावलावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या बाजुला सलुनचे दुकान, ईलेक्ट्रॉनीकचे दुकान व भांड्याचे दुकान आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आवारात नगर परिषद यांचे कार्यालय आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटना झाली तेव्हा नगर परिषद कार्यालय व आजुबाजुचे दुकान सुरू होते. हे म्हणणे खरे नाही की, नगर परिषदेच्या आवारामध्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरा लावला आहे. नगरपरिषदेच्या आवारामध्ये सी.सी.टी.व्ही. आहे, असे प्रमाणपत्र मी नगर परिषदेकडुन प्राप्त करून घेतले नाही.

११. मी घटनास्थळी गेलो होतो. मी निशानी क्रमांक २३ ते २५ फोटोग्राफरच्या मार्फत काढुन घेतले होते. घटनास्थळ हे फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे फ्रेमच्या मागे आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे दुकानातुन दिसते. दुकानात उभे राहिल्यानंतर घटनास्थळ हे दिसते. फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे घटना ही दुपारी ०२.०० वाजता घडली. घटना घडल्यानंतर फिर्यादी ही तिच्या घरी निघुन गेली असे फिर्यादीने मला असे सांगीतले होते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने घटनेची माहीती तिच्या पतीला ०४.०० ते ०४.१५ वाजता दिली. घटनेची माहीती ज्या व्यक्तीच्या घरी फिर्यादी किरायाने राहत होती त्यांना दिली. माझ्या तपासाप्रमाणे फिर्यादीने सर्वांत पहिले घटनेची माहीती घरमालकांना दिली, त्यानंतर तीने तिच्या पतीला दिली.

१२. मी शारदा चोपकर हिचे बयान नोंदवुन घेतले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी ज्या दुकानामध्ये काम करत होती त्या दुकानामध्ये ती २० ते २५ दिवसाअगोदर कामाला लागली होती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व तिचे पती मुळचे बालाघाट येथील होते. तपासाच्या वेळी मी फिर्यादीला विचारपूस केली होती. घटनेची माहीती फिर्यादीने आजुबाजुच्या लोकांना तसेच नगर परिषदेच्या महिला कर्मचा–यांना दिली नव्हती.

**प्रश्न–** घटनास्थळावरून पोलीस ठाणे हे पाऊलाच्या अंतरावर आहे तर ती पोलीस ठाण्याला फिर्यादी का आली नाही याची विचारपूस केली का?

**उत्तर–** ती भितीमुळे आली नाही.

**प्रश्न–** ती भिती कशाची होती?

**उत्तर–** बदनामीची होती.

१३. हे म्हणणे खरे आहे की, घटनेची फिर्याद देण्याकरीता फिर्यादी ही तिचे पती व तीच्या पतीचे मित्र यांच्यासोबत पोलीस ठाण्याला आली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस ठाण्याला जाण्यापूर्वी त्यांनी आरोपीशी दुकानात जावुन भांडण केले होते.

**प्रश्न–** तुम्ही आजुबाजुच्या लोकांचे बयान का नोंदवुन घेतले नाही?

**उत्तर–** ज्यांनी बघीतले त्यांचेच बयान घेतले.

१४. मी नजरचुकीमुळे आजु बाजुच्या लोकांचे बयान नोंदवुन घेतले नाही. मी आरोपीच्या चारीत्र्याबद्दलची माहीती घेतली नव्हती. मी फिर्यादी व तिच्या पतीच्या चारीत्र्याबद्दलची माहीती बालाघाट येथे जावुन घेतली नव्हती. मी तपासामध्ये आरोपीने फिर्यादीला जे गालीचे वर ठेवण्यास सांगीतले होते ते जप्त केले नाही. फिर्यादीने दाखविलेल्या गालीच्याचा पंचनामा मी तयार केला नव्हता. दुकानामध्ये आरोपीची पत्नी कधी कधी बसायची काय याबद्दल मला माहीती नाही.

१५. मी आरोपीच्या पत्नीचे बयान नोंदवुन घेतले नाही. फिर्यादीच्या अगोदर जे कोणतेही लोक याच्या अगोदर दुकानात काम करत होते त्यांचे बयान मी नोंदवुन घेतले नाही. फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे आरोपीने तिला मागुन पकडुन तिचे चुंबन घेतले होते. मी फिर्यादीची व आरोपीची त्यांच्या एकमेकांच्या शरीरावर नमुन्याबद्दल डी.एन.ए. तपासणी केली नव्हती. तसेच आरोपी आणि फिर्यादीने जे कपडे घातले होते त्याची तपासणी केली नव्हती. फिर्यादी ज्या ठिकाणी राहत होती तेथील आजुबाजुच्या लोकांची मी तपासणी केली नव्हती. फिर्यादीचा पती ज्या दुध फॅक्टरीमध्ये काम करत होता त्याच्या व्यवस्थापकाला विचारपूस केली नव्हती.

१६. हे म्हणणे खरे नाही की, तपासादरम्यान माझ्या असे लक्षात आले होते की, फिर्यादीने आरोपीवर खोटे आरोप केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने आरोपीच्या दुकानामधुन दोन ते तीन साड्या गहाळ केल्या होत्या आणि त्याची विचारपूस केल्यामुळे फिर्यादीने आरोपीविरूध्द हा खोटा आरोप केला. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या पतीला आरोपीकडुन पैसे उकळायचे होते म्हणुन

खोटी फिर्याद द्यायला लावली.  हे म्हणणे खरे नाही की, पैशाच्या कारणावरून फिर्यादीच्या पतीने आरोपीसोबत पैशाच्या कारणावरून भांडण केले होते. हे म्हणणे खरे  नहाी की, ते भांडण शेजारील दुकानदाराने बघीतले, परंतु मी त्यांचे जाणुनबुजून त्यांचे बयान नोंदवुन घेतले नाही.

१७.      हे म्हणणे खरे  नाही की, सुनील पारधी व कांबळे हे फिर्यादीचे मित्र आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी जाणुनबुजून कोणतेही स्वतंत्र साक्षीदारांचे बयान नोंदविले नाही.  हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे कोणताही गुन्हा किंवा तिची छेळछाळ केली नाही.  हे म्हणणे खरे नहाी की, ती मुलगी फिर्यादी असल्यामुळे तीच्या सांगण्यावर विश्वास ठेवुन तिच्या पध्दतीने तपास केला.  हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद खोटी आहे की, खरी आहे याची मी शहानिशा केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व तिच्या पतीच्या दबावाखाली येवुन मी खोटा तपास केला व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
| स्वा/- | स्वा/- |
| (अ. वि. पंडित) | (अ. वि. पंडित) |
| न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी. | न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी. |
| १८/०३/२०२६ | १८/०३/२०२६ |